नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:१९/०६/२०२६

# पुणे महानगरपालिका
## मा. स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्र.१३

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.२५/०६/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका ( नवीन विस्तारित इमारत ) येथे भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**वृत्तांत कायम करणे.**

### उपायुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र.३१८**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील दि.०१/०५/२०२६ ते दि.३१/०५/२०२६ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/घकव्यका/१८८, दि.१८/०६/२०२६ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र.३१९**

**मा. गौरव गणेश घुले व सुहास विजय टिंगरे यांचे दि.१५/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र. २० ड मध्ये खालील विकास कामे करण्यासाठी र.रु.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता मिळावी

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | प्र.क्र.२० ड शंकर महाराज मठ. बिबवेवाडी येथील सातारा रोडवरील महावीर पार्क ते गुरुराज सोसा. (CE20A884/SA10-669) | १० लाख | |
| २. | प्र. क्र २० ड शंकर महाराज मठ बिबवेवाडी येथील बिबवेवाडी ओटामध्ये मराठी अक्षरांची पाटी (साईन बोर्ड) विषयक कामे करणे (CE20B102/512-1784) | १० लाख | |
| ३. | प्र. क्र २० ड शंकर महाराज- मठ बिबवेवाडी येथील मनपा शाळा क्र १जी सीताराम आबाजी बिबवे प्राथमिक विद्यालय येथे शाळा इमारत देखभाल दुरुस्ती करणे व नवीन शौचालय बांधणे, (CE12A422/SJ2-1379) | १० लाख | |
| ४. | प्र. क्र २० ड शंकर महाराज- मठ बिबवेवाडी येथील कै. चिंतामणराव देशमुख प्राथमिक विद्यालय म.न.पा. शाळा क्र.६१ (उर्दू) येथे ई लर्निंग स्कुल उभारणे व प्रभागात शाळेची भवन | १० लाख | |

| | | | |
|---|---|---|---|
| | विषयक कामे करणे. (CE12A422/SJ2-1381) | | |
| ५. | प्र. क्र २० ड शंकर महाराज- मठ बिबवेवाडी येथील बिबवेवाडी गावठाणाच्या जागेतील दत्त मंदिर येथे सांस्कृतिक हॉल उभारणे,(CE22A704/SJ20-1617) | १० लाख | |
| ६. | प्र. क्र. २० ड शंकर महाराज- मठ बिबवेवाडी येथील गंगाधाम परिसरातील गगन विहार, गगन गॅलेक्सी सोसायटीजवळ ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बनवणे(CE22A704/SJ20-1618) | १० लाख | |
| ७. | प्र. क्र. २० ड शंकर महाराज- मठ बिबवेवाडी येथील संपूर्ण प्रभागातील ओला व सुका कचऱ्याचे विल्हेवाट लावणेसाठी बँकेत वापरणे. (CE19A154/SH1-418) | १० लाख | |
| ८. | प्र. क्र. २० ड शंकर महाराज- मठ बिबवेवाडी येथील बचतगटातील महिलांना स्वतःचा उद्योग व्यवसाय उभारून आत्मनिर्भर व सक्षम होण्यासाठी स्वयंरोजगारासाठी निधी उपलब्ध करणे, (FE14C125/SM1-384) | १० लाख | |
| ९. | प्र. क्र. २० ड शंकर महाराज- मठ बिबवेवाडी येथील गंगाधाम परिसरापासून शंकर महाराज सोसायटीपर्यंत असलेल्या सर्व सोसायटीसाठी मोठ्या व्यासाची लाईन विकसित करणे. (ZE168102/SD2-5388) | १० लाख | |
| १०. | कचरा व्यवस्थापन सुरळीत करणेसाठी आरोग्यकोठी साठी घंटागाडी उपलब्ध करणे. (FE17A277/SVL-294 323) | १० लाख | |
| | **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १. | प्र. क्र २०ड शंकर महाराज मठ बिबवेवाडी परिसरात सांस्कृतिक भवन विरंगुळा केंद्र व भवन स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्ती करणे. | | १० लाख |
| २. | प्र. क्र २०ड शंकर महाराज मठ बिबवेवाडी परिसरात इंदिरानगर येथे ड्रेनेज विषयक कामे करणे | | १० लाख |
| ३. | प्र. क्र २०ड शंकर महाराज मठ बिबवेवाडी परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे. | | २० लाख |
| ४. | प्र. क्र २० ड बिबवेवाडी ओटा परिसरात ड्रेनेज व रस्ते विषयक कामे करणे | | १० लाख |
| ५. | प्र. क्र २० ड शंकर महाराज मठ बिबवेवाडी परिसरात २७६ ओटा परिसरात व इतर ठिकाणी ड्रेनेज दुरुस्ती करणे. | | १० लाख |
| ६. | प्र. क्र २० ड शंकर महाराज मठ बिबवेवाडी परिसरात नवीन ड्रेनेज लाईन व चेंबर विषयक कामे करणे | | १० लाख |
| ७. | प्रक्र २० ड अंतर्गत येणाऱ्या विविध कोठयावर मजूर पुरवणे. | | १० लाख |
| ८. | प्रक्र २० ड अंतर्गत मजुरांमार्फत ड्रेनेज साफसफाई करणे, गाळ | | १० लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| | काढणे. | | |
| ९ | प्र. क्र २० ड शंकर महाराज मठ व बिबवेवाडी परिसरात विविध विकासाची कामे. | | १० लाख |

**मुख्य सभा मान्यता देइल या भरोश्यावर सदर ठरावावर मा. महा.आयुक्त यांनी कार्यवाही करावी.**

**विषय क्र.३२०**

**मा. वृषाली कामठे व डॉ.दादा कोंद्रे यांचे दि.१६/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र. १९ कोंढवा खुर्द मध्ये विविध विकास कामे करणे करिता खालीलप्रमाणे र.रु. ०१ कोटी ७० लक्ष रुपयांचे वर्गीकरण करून मिळणेबाबत.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०२६-२७ पुणे महानगरपलिका अंदाजपत्रकामध्ये पुणे शहरातील मलनिःसारण विभागाकडील झोन क्र.४ मधील अचानक उद्भवणाऱ्या कामासाठी. | ०१ कोटी ७० लक्ष | --- |
| | **नवीन कामाचे नाव** | | |
| १. | प्रभाग क्र. १९ मध्ये कोंढवा खुर्द गावठाण येथील दशक्रिया विधी घाट भैरोबा नाला लगत R.C.C सीमाभिंत बांधणे. | --- | १ कोटी |
| २. | प्रभाग क्र. १९ मध्ये कोंढवा खुर्द गावठाण (भैरवनाथ आळी) येथे जुन्या /अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलणे व आवशयक क्षमतेच्या मोठ्या व्यास्याच्या वाहिन्या विकसित करणे. | --- | ७० लक्ष |

**विषय क्र.३२१**

**मा. नंदिनी धेंडे व मा. हर्शल टिंगरे यांचे दि.१६/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र. २ अ मधील मुकुंदराव आंबेडकर चौक विश्रांतवाडी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविणार आहे तिथे तद्नुषंगिक कामे करणे करिता खालीलप्रमाणे र.रु. ६५ लाख रुपयांचे वर्गीकरण करून मिळणेबाबत.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०२६-२०२७ अंदाजपत्रक, यादी क्र. SJ2 बजेट कोड नं. CE12A422/SJ2-1301 प्र.क्र. २ अ मध्ये आप्पासाहेब जाधव शाळा येथे नवीन वरचा मजला बांधणे. | १५ लाख | --- |
| २. | सन २०२६-२०२७ अंदाजपत्रक, यादी क्र. SJ2 बजेट कोड नं. CE12A422/SJ2-1444 प्र.क्र. २ अ मध्ये आप्पासाहेब जाधव शाळा येथे नवीन वरचा मजला बांधणे. | ५० लाख | --- |
| | **नविन सुचविलेले काम** | | |
| १. | प्रभाग क्र. २ अ मधील मुकुंदराव आंबेडकर चौक विश्रांतवाडी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविणार आहे तिथे तद्नुषंगिक कामे करणे. | --- | ६५ लाख |

**मुख्य सभा मान्यता देइल या भरोश्यावर सदर ठरावावर मा. महा.आयुक्त यांनी कार्यवाही करावी.**

**विषय क्र.३२२**

**मा. रत्नमाला संदिप सातव यांचे दि.१६/०६/२०२६ चे पत्र.**

**विषय :** वाघोली जकात नाका – बायफ रोड- बकोरी रोड- गाडे वस्ती- नगर रोड या ३० मीटर रुंदीच्या विकास आराखड्यातील (RP 1997) रस्त्याच्या भू-संपादन व विकासाबाबत.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील वाघोली परिसरात अनेक वर्षे पासून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी समस्या निर्माण झाली. याची कल्पना आपल्या सर्वांना आहे. नागरिकांना नाहक त्रास व मरण यातना सहन करावा लागत आहे. अनेक अपघात होऊन जीवितहानी झाली आहे. तसेच आपत्कालीन परिस्थिती मध्ये ॲम्ब्युलन्स, फायर ब्रिगेड गाडी वेळेवर पोहचू शकत नाही. नागरिकांना कामावर जाण्यासाठी मुलांना शाळेत जाण्यासाठी वेळेवर पोहचण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. वाघोली मधून बाहेर जाण्यासाठी कुठल्याही पर्यायी रस्ता नाही. राजणगांव, सणसवाडी, कोरेगाव एमआयडीसी, परिसरात खडी क्रेशर प्लांट, खराडी आयटी पार्क, मोठे मोठे शिक्षण संस्था, यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. यावर उपाय म्हणून दु मजली पूल व रामवाडी ते वाघोली मेट्रोची मंजुरी झाली आहे. हे काम चालू करण्याअगोदर एक तरी वाघोली बाह्यवळण मार्ग होण्याची अत्यंत गरजेचे आहे. तरच सदर प्रकल्पचे काम चालू होऊ शकेल यासाठी नगर रोड ला समांतर असणारा जकात नाका ते बायफ रोड, बकोरी रोड, गाडे वस्ती मार्गे नगर रोडपर्यंतचा 30 मीटर रुंदीचा सन 1997 साली आर.पी. रस्ता मंजूर आहे. सदर रस्ता परिसरातील वाहतूक व्यवस्था, नागरिकांची दळणवळण सुविधा, आपत्कालीन सेवा, सार्वजनिक वाहतूक तसेच परिसराच्या नियोजित विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्याचा 60 टक्के भागावर FSI घेऊन मोठ्या गृहनिर्माण प्रकल्प झाले आहे राहिलेल्या 40 टक्के रस्ता शेतकरी, खाजगी मालमत्ता आहे. जागा मालक जमीन देण्यासाठी तयार आहेत. त्यांना योग्य तो मोबदला देणे गरजेचे आहे या जमिनीमुळे रस्ता विकासाचे काम प्रलंबित आहे. परिणामी वाहतूक कोंडी, नागरिकांना होणारा त्रास, अपघातांची शक्यता तसेच परिसराच्या विकासात अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे पुणे महानगरपालिकेने सदर 30 मीटर रुंदीच्या RP रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व जमिनींचे सर्वेक्षण करून भू-संपादनाची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी. आवश्यकतेनुसार भूसंपादन, थेट खरेदी, TDR, FSI किंवा लागू असलेल्या इतर कायदेशीर माध्यमांचा अवलंब करून रस्त्यासाठी आवश्यक जमीन संपादित करण्यात यावी. तसेच संबंधित प्रस्ताव महानगरपालिका आयुक्त यांच्या मान्यतेने संबंधित विभाग यांच्याकडे भूसंपादन कार्यवाहीसाठी तत्काळ पाठविण्यात यावा व सदर रस्त्याच्या कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

**विषय क्र.३२३**

**मा. रत्नमाला संदिप सातव यांचे दि.१६/०६/२०२६ चे पत्र.**

विषय : प्रभाग क्रमांक ४ ब मधील प्रभू श्रीराम उद्यान वाघोली येथे आधुनिक व पुरेशी प्रकाश व्यवस्था उभारण्याबाबत.

पुणे महानगरपालिका हद्दीतील प्रभू श्री राम उद्यान हे परिसरातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक व बालकांसाठी एक महत्त्वाचे सार्वजनिक उद्यान आहे. सदर उद्यानामध्ये सकाळी व सायंकाळी मोठ्या प्रमाणावर नागरिक फिरण्यासाठी, व्यायामासाठी व मनोरंजनासाठी येत असतात.

मात्र, उद्यानामध्ये प्रकाश व्यवस्था उपलब्ध नसल्याने सायंकाळच्या वेळेत अंधाराचे प्रमाण वाढते. यामुळे नागरिकांना गैरसोय होत असून सुरक्षेच्या दृष्टीनेही समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी उद्यानामध्ये योग्य प्रकाश व्यवस्था असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रभू श्री राम उद्यानामध्ये महावितरण विद्युत मीटर व आवश्यक त्या ठिकाणी एलईडी दिवे, हायमास्ट दिवे, विद्युत खांब व संबंधित विद्युत यंत्रणा उभारून संपूर्ण उद्यान परिसर प्रकाशमय करण्यात यावा. तसेच सदर कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र.३२४**

**मा. रत्नमाला संदिप सातव यांचे दि.१६/०६/२०२६ चे पत्र.**

विषय : मनपा प्राथमिक शाळा, विठ्ठलवाडी, वाघोली येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे, संरक्षण सीमाभिंत बांधणे व बोअरवेलसाठी मोटार उपलब्ध करून देण्याबाबत.

पुणे महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळा, विठ्ठलवाडी, वाघोली येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी व मूलभूत सुविधांच्या उपलब्धतेसाठी आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. सदर शाळेच्या परिसरामध्ये अंतर्गत आवारात पावसाळ्यात चिखल व पाणी साचण्याची समस्या निर्माण होते. तसेच शाळेच्या बाजूला विहीर असल्यामुळे लहान मुलांना सुरक्षित संरक्षण सीमाभिंत नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोका निर्माण होऊ शकतो. जीवित हानी होऊ शकते याशिवाय शाळेतील पाणीपुरवठा सुरळीत राहण्यासाठी अस्तित्वात असलेल्या बोअरवेलवर आवश्यक क्षमतेची मोटार उपलब्ध करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वातावरण अधिक सुरक्षित, स्वच्छ व सुविधायुक्त करण्याच्या उद्देशाने खालील कामे तातडीने हाती घेणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने स्थायी समिती पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करावा :

मनपा शाळा, विठ्ठलवाडी, वाघोली येथे शाळेच्या आवारात आवश्यक क्षेत्रामध्ये दर्जेदार पेव्हिंग ब्लॉक बसविण्यात यावेत. शाळा परिसराच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उंचीची व दर्जेदार संरक्षण सीमाभिंत (Compound Wall) बांधण्यात यावी. शाळेतील अस्तित्वात असलेल्या बोअरवेलसाठी आवश्यक क्षमतेची विद्युत मोटार, पंप संच व संबंधित साहित्य उपलब्ध करून पाणीपुरवठा कार्यान्वित करण्यात यावा.

संबंधित विभागामार्फत स्थळ पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्यात यावे व प्रशासकीय मान्यता घेऊन कामे तातडीने हाती घेण्यात यावीत.

सदर कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत.

काम पूर्ण झाल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल स्थायी समितीसमोर सादर करण्यात यावा.

**विषय क्र.३२५**

**मा. नंदा अनिल आबनावे व प्रतिभा रोहिदास चोरघे यांचे दि.१७/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र. १५-अ खालील विविध विकास कामे करणेसाठी रु. ०१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकातील बजेट कोड CE20D170/SL1-248 अंतर्गत "प्रभाग क्र. १५-अ मधील महात्मा फुले चौक, मुंढवा येथे उड्डाणपूल करणे" | १ कोटी | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |

| | | |
|---|---|---|
| १)प्रभाग क्रमांक १५अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. | --- | २५ लाख |
| २) प्रभाग क्र. १५-अ मध्ये दिशादर्शक नामफलक (Direction Sign Boards) उभारणे व दुरुस्ती करणे | --- | २० लाख |
| ३) प्रभाग क्र. १५-अ मध्ये विविध विकासकामे करणे. | --- | १५ लाख |
| ४) प्रभाग क्र. १५-अ मध्ये नागरिकांच्या सोयीसाठी बाकडे पुरविणे व बसविणे. | --- | १५ लाख |
| ५) प्रभाग क्र. १५-अ मध्ये किरकोळ कामे मजुरामार्फत करून घेणे. | --- | २५ लाख |

**विषय क्र.३२६**

**मा. श्वेता सचिन घुले यांचे दि.१८/०६/२०२६ चे पत्र.**

प्रभाग क्र. ४१ क मधील खालील कामांसाठी रुपये. ३०,००,०००/- ( तीस लक्ष ) लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| प्र. क्र. ४१ क मध्ये उंड्री येथील महालक्ष्मी विहार येथे कल्व्हर्ट करणे. (बजेट कोड CE20A102/SA2-3172) | ३० लक्ष | --- |
| <u>नविन सुचविलेले काम</u><br>प्र. क्र. ४१ क मधील नवीन समाविष्ट गावांमध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन विकसित करणे. | --- | १० लक्ष |
| प्र. क्र. ४१ क मधील नवीन समाविष्ट गावांमध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन विकसित करणे. | --- | २० लक्ष |

<u>माहितीसाठी आलेले विषय</u>

**विषय क्र.३२७**

दिनांक ०१/०६/२०२६ ते ०७/०६/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ३८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/१७६, दि.११/०६/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ३२८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.२ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०४/२०२६ ते दि.३०/०४/२०२६ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (ड) नुसार मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.२/१७९, दि.१२/०६/२०२६ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र.३२९**

प्रभाग क्र.३१ मधील स.नं. ९ कर्वे नगर मधील प्ले ग्राउंड आरक्षित जागेवर अर्चरीचे मैदान विकसित करणे, या कामासाठी चालू वर्षातील ८२.५० लक्ष व्यतिरिक्त पुढील सन २०२७-२८ मध्ये रक्कम रुपये ४९२.५० लक्ष (स्थापत्य व विद्युत कामासाठी) पर्यंत अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करणे त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाचे दायीत्व स्विकारण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील १९४९ चे कलम ७२ (ब) अन्वये मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभा यांची मान्यता मिळणेबाबत. मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन /१०५, दि. १४/५/२०२६ चे पत्र.
**(टीप : सदरील विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.१६/०६/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. ३३०**

घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कचरा प्रक्रिया प्रकल्प चालक मे. भूमी ग्रीन एनर्जी यांनी भागीदारी संस्थेचे स्वरूप बदलून मर्यादित दायित्व भागीदारी (एलएलपी) करून नावात मे. भूमी ग्रीन एनर्जी एनव्हारोकेअर एलएलपी असा बदल केल्याने मे.भूमी ग्रीन एनर्जी एनव्हारोकेअर एलएलपी या नावाने त्यांचे सोबत सुधारित करारनामा करणेस, सदर ठेकेदाराने केलेल्या कामाची होणारी देयके मे. भूमी ग्रीन एनर्जी एनव्हारोकेअर एलएलपी या नावाने अदा करणेस खालील बाबींस मान्यता घेणेबाबत. मा. महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मआ/घनकचरा/११८ दि. १८/०५/२०२६ चे पत्र.
**(टीप : सदरील विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.१६/०६/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**विषय क्र. ३३१**

आरोग्य खात्याकडे करार पद्धतीने एकवट वेतनावर विविध संवर्गातील पदांच्या सेवकांना मुदतवाढ मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र.मआ/आरोग्य/१७५, दि. ११/०६/२०२६ चे पत्र.
**(टीप : सदरील विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.१६/०६/२०२६चे सभेत ठरले होते.)**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**